**SHREE GANESH STAMPINGS PRIVATE LIMITED**
**CIN: U31902PN2010PTC135299**
**(A Company under Liquidation vide Hon'ble NCLT, Mumbai order dated 06.12.2022)**
**Registered Office: PLOT NO L-135/5/2 MIDC INDUSTRIAL AREA ,**
**AHMEDNAGAR, Maharashtra, India - 414111.**

## E-AUCTION

Notice is hereby given that SHREE GANESH STAMPINGS PRIVATE LIMITED (In Liquidation) (Corporate Debtor) is proposed to be sold, in accordance with Clause E of Reg. 32, 32(A) Sub Reg. 1 of Reg 33 and Schedule 1 of Insolvency and Bankruptcy Board of India (Liquidation Process) Regulation, 2016 through E-Auction Platform https://baanknet.com/
**Address for All Assets:**Located at Plot No L-135/5/2, Midc Industrial Area, Ahmednagar – 414111,

| Particulars | Date and time of auction | Reserve Price | Earnest Money Deposit | Incremental Bid value |
|---|---|---|---|---|
| **Option-A** – Sale of undertaking as a whole in slump sale under Regulation 32(b) with respect to the Corporate Debtor Shree Ganesh Stamping Pvt. Ltd. | 03:00 PM to 04:00 PM on 25.11.2025 | 2,75,00,000.00 | 27,50,000.00 | 5,00,000.00 |
| **Option-B**-Sale of Assets of Corporate Debtor in parcel | 04:30 PM to 05:30 PM on 25.11.2025 | | | |
| Parcel-1 (Plant and Machinery) | | 91,00,000.00 | 9,10,000.00 | 1,00,000.00 |
| Parcel-2 (Inventory including tools and consumables) | | 45,00,000.00 | 4,50,000.00 | 1,00,000.00 |

**Important Notes:**
1.The sale shall be subject to the Terms and Conditions prescribed in the "EAuction Process Information Document" available at https:// https://baanknet.com// and to the following conditions;
2.In case there are no bids received for Option-A then only the bids for Option-B shall be considered. EMD amount, received for such bidder whose auction got cancelled shall be returned within 5 days.
3.It is clarified that, this invitation purports to invite prospective bidders and does not create any kind of binding obligation on the part of the Liquidator or the Company to effectuate the sale. The Liquidator of Shree Ganesh Stamping Private Limited reserves the right to suspend/ abandon/ cancel/extend or modify process terms and/or reject or disqualify any prospective bidder/bid/offer at any stage of the e-auction process without assigning any reason and without any liability.
4.E-Auction will be conducted on "AS IS WHERE IS", "AS IS WHAT IS", "WHATEVER THERE IS", "NO RECOURSE BASIS" and 'ALLOTMENT OF LAND HAVING BEEN CANCELLED BY MIDC" through approved service provider, M/s. PSB Alliance Private Limited (https://baanknet.com/)
5.The bidders cannot place a bid at a value below the reserve price.
6.The time period for payment by successful bidder shall be as provided in Clause 12 of Schedule 1 of IBBI (Liquidation Process) Regulations, 2016. Further, in accordance with Regulation 31A(1)(h) of the Liquidation Regulations, the Liquidator has kept a provision for extension of the timeline for payment of balance sale consideration by the successful bidder, which is however, strictly subject to approval by the members of the SCC.
7.The last date for submission of eligibity documents and bid documents as mentioned in the process documents is 23.11.2025. Inspection date 10.11.2025 to 23.11.2025 and submission of Earnest Money Deposit (EMD) through the Baanknet auction platform.
8.The prospective bidders shall submit an undertaking that they do not suffer from any ineligibility under section 29A of the IBC, 2016 to the extent applicable and if found ineligible at any stage, the Earnest Money Deposit shall be forfeited.
9.Any modification in timelines and/or in the "e-auction process information document" including terms and conditions will be notified in the website of M/s. PSB Alliance Private Limited (https://baanknet.com/)
10.Payment of EMD (Earnest Money Deposit) can be done till 23.11.2025 only by way of payment with e-wallet of M/s. PSB Alliance Private Limited (https://baanknet.com)
11.All eligibility documents need to be uploaded till 23.11.2025 only on baanknet portal.
Please feel free to contact Manoj Kumar Mishra at liquidation.ganesh@gmail.com in case of any further clarification is required.

Date: 25/10/2025
Place: Mumbai


**Manoj Kumar Mishra**
In the capacity of Liquidator
**M/s.** Shree Ganesh Stampings Private Limited
**IP Regn. No.** IBBI/IPA-001/IP-P/01152/2018-2019/11902
**AFA valid upto** 31.12.2025
**Regd. Address:** Office No. 13/14, 2nd Floor,
84/ Dholakawala Building, Janmabhoomi Marg, Fort, Mumbai, MH - 400 001
**Regd. Email ID:** ipmanojkumarmishra@gmail.com
**Correspondence Email ID**: liquidation.ganesh@gmail.com

# ‘स्थानिक’च्या निवडणुकीपूर्वी ‘ऑपरेशन लोटस’- राधाकृष्ण विखे

लोकसत्ता वार्ताहर

**संगमनेर :** सुनीता भांगरे आणि अमित भांगरे यांनी आपली भेट घेतली हे खरे आहे. या भेटीप्रसंगी माजी आमदार वैभव पिचडदेखील उपस्थित होते. त्यांच्याबाबतचा अंतिम निर्णय होईलच, असे सांगताना नगर जिल्ह्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीपूर्वी ‘ऑपरेशन लोटस’ निश्चित होईल. अनेक जण आमच्या पक्षात येण्यास इच्छुक आहेत. वेळ येईल तेव्हा सर्व नावे पुढे येतील, असे सूचक वक्तव्य पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी संगमनेरमध्ये बोलताना केले.

महायुतीच्या वतीने आज, शनिवारी आयोजित करण्यात आलेल्या दीपावली स्नेहमिलन कार्यक्रमानंतर ते पत्रकारांशी बोलत होते. या वेळी ते म्हणाले, की जिल्ह्यातील अनेक जण भाजपमध्ये येण्यास इच्छुक आहेत. पक्षाची क्षमता वाढवू शकणाऱ्या लोकांना बरोबर घेण्याचे धोरण असून, त्या दृष्टीने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीपूर्वी पक्षाच्या विस्ताराचे काम सुरू आहे. विधानसभा निवडणुकीप्रमाणेच आगामी निवडणुकीमध्येसुद्धा मोठे परिवर्तन होईल.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी भाजपमधील नव्या-जुन्या कार्यकर्त्यांच्या संदर्भात केलेल्या वक्तव्याबाबत प्रतिक्रिया देताना विखे म्हणाले, की गडकरी ज्येष्ठ नेते आहेत. मात्र, त्यांच्या मताशी मी सहमत नाही. त्यांनी कोणत्या संदर्भात विधान केले, मला माहीत नाही. मात्र नव्या-जुन्या कार्यकर्त्यांचा मेळ घालूनच पक्ष पुढे गेला आहे. सर्वांच्या समन्वयाने राज्यात महायुतीचे सरकार येऊ शकले. पक्षाचा विस्तारसुद्धा सर्वांचा मेळ घालून होत आहे.



संगमनेरमध्ये महायुतीच्या वतीने दीपावली स्नेहमिलन कार्यक्रम आयोजित केला होता. या वेळी पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांना आमदार अमोल खताळ यांनी फराळाचा घास भरवला.

## शत-प्रतिशत महायुती - विखे

संगमनेरच्या जनतेने मागील दिवाळीला आमदार अमोल खताळ यांना विजयी करून महायुतीला मोठी भेट दिली होती. या वेळची भेट म्हणून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत शत-प्रतिशत महायुतीचा संकल्प करा. आमच्या निवडणुका झाल्या, आता कार्यकर्त्यांच्या निवडणुका आहेत. त्यामुळे जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि नगरपालिकेच्या निवडणुकीत गट-तट बाजूला ठेवून महायुती जो उमेदवार देईल, त्याच्यामागे उभे राहा, असे आवाहन मंत्री विखे पाटील यांनी कार्यक्रमात केले.

परिवर्तन विकासासाठी संगमनेरच्या जनतेने विकासाचा दीप प्रज्वलित करून आपल्याला दिलेली संधी खूप मोठी आहे. त्यांच्या ऋणातून मी कधीही मुक्त होऊ शकणार नाही. लोकांनी केलेले परिवर्तन विकासासाठी आहे. आगामी काळात आपल्याला तालुक्यात विकासाची प्रक्रिया पुढे घेऊन जायची आहे. यासाठी जनतेची साथ हवी आहे.
- अमोल खताळ, आमदार

सोनईची (ता. नेवासा) घटना मानवतेला काळीमा फासणारी असून, त्या संदर्भात पोलीस उपमहासंचालक आणि जिल्हा पोलीस अधीक्षकांशी चर्चा झाली आहे. आरोपी कोणीही असो, कारवाई होणारच. मात्र संघाच्या कार्यकर्त्यांशी संबंध जोडून कोणी स्वतःचा बचाव करीत असेल, तर ते शक्य होणार नाही. पोलीस चौकशी करून दोन-तीन दिवसांत अहवाल सादर करतील, अशीही माहिती त्यांनी दिली.

# लोणी ग्रामपंचायतीकडे अडीच कोटींच्या ठेवी जमा

## ग्रामसभेला १०८ वर्षांची परंपरा



लोणी बुद्रुक ग्रामसभेत पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांचे भाषण झाले. समवेत अण्णासाहेब म्हस्के, शालिनी विखे, डॉ.सुजय विखे उपस्थित होते.

लोकसत्ता वार्ताहर

**राहाता :** ग्रामस्थ आणि नागरिकांच्या सहकार्यामुळे लोणी बुद्रुक ग्रामपंचायतीने देश व राज्य पातळीवरील अनेक पुरस्कार प्राप्त केले. गावात अनेक विकासकामे झाली. गावाच्या एकोप्यामुळे अडीच कोटींच्या ठेवी असलेली ही जिल्ह्यातील एकमेव ग्रामपंचायत असल्याचे प्रतिपादन पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी केले.

१०८ वर्षांपासून लोणी बुद्रुक येथे दिवाळी पाडव्याला ग्रामसभेचे आयोजन केले जाते. ग्रामसभेला जिल्हा बँकेचे ज्येष्ठ संचालक अण्णासाहेब म्हस्के, जि.प.च्या माजी अध्यक्षा शालिनी विखे, माजी खासदार तथा विखे कारखान्याचे अध्यक्ष डॉ. सुजय विखे, सरपंच कल्पना मैड, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष संपत विखे, प्रवरा बँकेचे संचालक किसन विखे, बाजार समितीचे संचालक राहुल धावणे, विकास सोसायटीचे अध्यक्ष अशोक धावणे, उपाध्यक्ष नाना म्हस्के, उपसरपंच गणेश विखे, एम. वाय. विखे, रंगनाथ विखे, वसंत विखे, अण्णा म्हस्के, विजय लगड यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

मंत्री विखे म्हणाले की, काळानुरूप विकासाचे प्रकल्प प्रगतिपथावर आहेत. व्यावसायिकांनी गाळा भाडे व नागरिकांनी पाणी व घरपट्टी भरून पंचायतीला सहकार्य केले पाहिजे. राज्य आणि केंद्र सरकारच्या माध्यमातून विविध योजनांचा निधी आपण मिळवून देऊ. लोणी हे गाव शैक्षणिक केंद्र असल्याने विद्यार्थी आणि त्यांचे पालक यांना कोणतीही अडचण येणार नाही यासाठी ग्रामस्थांनी जागरूक राहावे. ओढे, नाल्यातून पाणी जाण्यात निर्माण झालेले अडथळे दूर केले जातील. त्यावरील अतिक्रमण काढून टाकण्याच्या सूचना दिल्या आहेत.

अण्णासाहेब म्हस्के म्हणाले, लोणी गावचा वेगाने विस्तार होत असल्याने सोयीसुविधा निर्माण करण्याचे आव्हान ग्रामपंचायतीपुढे असते. मंत्री विखे यांच्यामुळे निधी उपलब्ध होण्यात अडचण येत नाही. बाजारपेठ वाढली आहे. पिण्याच्या पाण्याची नवीन योजना पूर्णत्वाकडे आहे. अनिल एकनाथ विखे यांनी स्वागत केले. ग्रामविकास अधिकारी कविता आहेर यांनी विकास कामांची माहिती दिली. अनिल नानासाहेब विखे यांनी आभार मानले.

### भाडेकरूंची पोलीस पडताळणी

गावातील भाडेकरूंची माहिती घरमालकाने ग्रामपंचायतीकडे देणे आवश्यक आहे. भाडेकरूंची आता पोलीस पडताळणी होणार आहे. गावात गुन्हेगारी येऊ नये व इथल्या महिला, मुलींची सुरक्षितता लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आला आहे. गावातील ज्या कुटुंबात आजपर्यंत व्यापारी संकुलात एकही गाळा मिळालेला त्यांना प्राधान्याने नूतन संकुलात गाळा देण्यात येणार आहे. कोणी गावात गुन्हेगारीला शिरकाव करू देणार नाही.
-डॉ. सुजय विखे

# सोनईतील घटनेच्या निषेधार्थ घोडेगाव येथे ‘रास्ता रोको’

लोकसत्ता प्रतिनिधी

**अहिल्यानगर :** सोनई (ता. नेवासा) येथे मातंग समाजाच्या तरुणाला झालेली निर्घृण मारहाण व अत्याचाराच्या निषेधार्थ आंबेडकर चळवळीतील कार्यकर्त्यांनी आज, शनिवारी घोडेगाव येथे रास्ता रोको आंदोलन केले.

गेल्या आठवड्यात सोनई येथील संजय वैरागर या तरुणाला बेदम मारहाण करून त्याच्यावर अत्याचार केल्याची घटना घडली. या संदर्भात पोलिसांनी ११ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी आतापर्यंत चार आरोपींना अटक केली आहे. प्रमुख आरोपी मात्र अद्याप फरार आहेत. त्यांच्यावर मोक्कांतर्गत कारवाई करण्याच्या मागणीसाठी रास्ता रोको आंदोलन करण्यात आले.

या वेळी ज्येष्ठ नेते अशोक गायकवाड यांनी घटनेचा निषेध केला. रवी आल्हाट, रिपब्लिकन पक्षाचे जिल्हाध्यक्ष सुरेंद्र थोरात, अजिक्य चांदणे, नितीन शिरसाट, पप्पू इंगळे, सुशील धायजे, दादा वैरागर आदींनी आंदोलनाचे नेतृत्व केले. मोठा पोलीस बंदोबस्त तैनात होता. रास्ता रोकोमुळे बराच काळ वाहतूक विस्कळीत झाली होती.

# विशेष शिक्षकांची दिवाळी अंधारातच

## तीन महिन्यांपासून वेतनाच्या प्रतीक्षेत



तीन महिन्यांपासून वेतन मिळाले नसल्याने नगर जिल्ह्यातील विशेष शिक्षकांनी शिक्षणमंत्री दादा भुसे यांची भेट घेतली व व्यथा मांडल्या.

लोकसत्ता प्रतिनिधी

**अहिल्यानगर :** राज्यातील दिव्यांग विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणाऱ्या विशेष शिक्षकांना गेल्या तीन महिन्यांपासून वेतन मिळालेले नाही. त्यामुळे या शिक्षकांच्या कुटुंबाची दिवाळी अंधारात गेली आहे. विशेष शिक्षकांच्या या समस्येकडे राज्य सरकारचे लक्ष वेधण्यासाठी नगरमधील विशेष शिक्षकांच्या शिष्टमंडळाने शिक्षणमंत्री दादा भुसे यांच्या निवासस्थानी जाऊन भेट घेतली व व्यथा मांडल्या.

भुसे यांनी या परिस्थितीची दखल घेत तत्काळ कार्यवाहीचे निर्देश दिले. या वेळी ते म्हणाले, की शिक्षक हे समाजाच्या घडणीतील सर्वात महत्त्वाचे घटक आहेत. त्यांच्या हक्काच्या वेतनास विलंब होणे ही अत्यंत खेदजनक बाब आहे. जबाबदार अधिकाऱ्यांनी तातडीने नियोजन करून शिक्षकांना न्याय द्यावा. या वेळी त्यांनी शिक्षण सचिवांना निर्देश देऊन तातडीने कार्यवाही करण्याचे आदेश दिले. तसेच शिक्षकांना प्रोत्साहन व प्रेरणा देणे आवश्यक असल्याचे स्पष्ट केले.

या प्रश्नासंदर्भात माहिती देताना विशेष शिक्षक उमेश शिंदे यांनी सांगितले की, शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांच्या ढिसाळ नियोजनामुळे ही परिस्थिती निर्माण झाली आहे. राज्यात २९८४ विशेष शिक्षक अनेक वर्षांपासून कार्यरत आहेत. नगर जिल्ह्यातील विशेष शिक्षकांची संख्या १२८ आहे. हे शिक्षक कोणतीही अपेक्षा न ठेवता दिव्यांग विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न करत आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक गुणवान विद्यार्थी घडत आहेत. परंतु दुर्दैवाने अद्याप त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप पडलेली नाही. त्यांना कोणताही सन्मान दिला जात नाही. नियमित वेतनही मिळाले नसल्याने दिवाळी अंधारातच गेली आहे.

शिक्षणमंत्र्यांनी ३ डिसेंबरला जागतिक दिव्यांग दिनानिमित्त राज्यस्तर व जिल्हास्तरावर हेलन केलर व लुईस ब्रेल पुरस्कारांच्या नावाने विशेष शिक्षक व उत्कृष्ट दिव्यांग विद्यार्थ्यांचा गौरव करण्याचा प्रस्ताव सादर केला. या मागणीवरही मंत्री भुसे यांनी सकारात्मक प्रतिसाद देत शिक्षण सचिवांना कार्यवाही करण्याचे आदेश दिले आहेत.

या वेळी उमेश शिंदे, अमोल पाटील, पिंटू अहिरे, विकी बडगे, सुनील अहिरे, राहुल पाटील आदींसह जिल्ह्यातील विशेष शिक्षक उपस्थित होते. या सर्वांनी वेतन विलंबाचा निषेध नोंदवला व शिक्षकांच्या हक्कासाठी लढा सुरूच ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला.

# महापालिका निवडणुकीसाठी प्रभागनिहाय मतदारयादीचे काम

## विभाजनासाठी कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण

लोकसत्ता प्रतिनिधी

**अहिल्यानगर :** महापालिकेच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकीसाठी अंतिम प्रभागरचना प्रसिद्ध झाल्यानंतर आता राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार मतदारयादीचा कार्यक्रम सुरू करण्यात आला आहे. १ जुलै २०२५ या अर्हता तारखेची शहर विधानसभा मतदारसंघाची यादी गृहीत धरली जाणार असून, त्याचे १७ प्रभागांत विभाजन केले जाणार आहे.

मनपा कर्मचाऱ्यांनी मतदारयादीचे विभाजन करताना हद्दीबाहेरील मतदारांचा समावेश होणार नाही, याची दक्षता घ्यावी व यादीची पडताळणी करावी, अशा सूचना आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी कर्मचाऱ्यांना दिल्या आहेत.

राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार, ६ नोव्हेंबरला प्रारूप मतदारयादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. त्याचे काम महापालिकेकडून सुरू करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर कर्मचाऱ्यांना प्रशिक्षणासाठी आयुक्त डांगे यांच्या मार्गदर्शनाखाली मनपा सभागृहात बैठक घेण्यात आली.

आयुक्त डांगे यांनी सांगितले, की शहर विधानसभेच्या मतदारयादीतून भिंगार व बुरुडगाव येथील मतदार वगळून महापालिका हद्दीची यादी स्वतंत्र करावी. त्याचे १७ प्रभागांनुसार विभाजन करावे. शहराच्या हद्दीबाहेरील मतदारांचा समावेश होणार नाही याची दक्षता घ्यावी. मतदारांची संख्या आणि महापालिकेसाठी तयार केलेल्या प्रभागनिहाय प्रारूप मतदारयादीतील मतदारांची एकूण संख्या समान असणे आवश्यक आहे. त्याची खात्री करावी, असे त्यांनी सांगितले.

तसेच, मतदारयादीतील दुबार नावांबाबत, मयत अथवा स्थलांतरित मतदारांच्या बाबतीत आयोगाच्या आदेशानुसार विशिष्ट चिन्हे करून अशा मतदारांची ओळखीचे पुरावे तपासण्यासाठी केंद्राध्यक्षांना कळवण्यात यावे. विधानसभेसाठी तयार करण्यात आलेल्या मतदारयादीमध्ये नवीन नावांचा समावेश करणे, नाव वगळणे, नावातील दुरुस्ती व पत्त्यामधील दुरुस्ती करणे इत्यादीबाबतची कार्यवाही करण्यात येणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# ‘मनपा’च्या पथकाकडून न्यूक्लिअस रुग्णालयाची तपासणी

## करोना काळातील रुग्णाच्या मृत्यूचे प्रकरण

लोकसत्ता प्रतिनिधी

**अहिल्यानगर :** करोना संसर्ग झाल्याचा बनाव करत वयोवृद्ध रुग्णावर उपचार करताना मृत्यू झाल्याप्रकरणी दाखल झालेल्या गुन्ह्याच्या अनुषंगाने महापालिकेच्या आरोग्य विभागाच्या पथकाने बालिकाश्रम रस्त्यावरील न्यूक्लियस रुग्णालयाची आज, शनिवारी तपासणी केली.

आरोग्य विभागाचे डॉक्टर व इतर कर्मचारी अशा पाच जणांच्या पथकाने आज सकाळी न्यूक्लियस रुग्णालयास भेट देऊन तपासणी केल्याचे मनपाचे वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजुरकर यांनी सांगितले.

ऑगस्ट २०२० मध्ये ७९ वर्षीय वयोवृद्ध रुग्णाला करोना संसर्ग झाल्याचा बनावट चाचणी अहवाल तयार करून त्यांच्यावर चुकीचे उपचार करून, अवाजवी देयकाची रक्कम वसूल करून, मानवी अवयवाची तस्करी व पुरावा नष्ट करण्यासाठी मृतदेहाची विल्हेवाट लावली अशा विविध आरोपांवरून तोफखाना पोलिसांनी ६ डॉक्टरांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. निधन झालेल्या रुग्णाचे चिरंजीव अशोक खोकराळे यांनी उच्च न्यायालयात धाव घेतली होती. यातील डॉ. गोपाळ बहुरूपी व डॉ. सुधीर बोरकर यांनी अटकपूर्व जामिनासाठी न्यायालयात अर्ज दाखल केले आहेत. त्यावरील सुनावणी २८ ऑक्टोबरला आहे.

हे दोघे डॉक्टर रुग्णालयात उपस्थित नसताना कोण उपचार करते, तेथे कोणती पर्यायी व्यवस्था करण्यात आली आहे, तेथील सुविधा, उपचारपद्धती या संदर्भात माहिती घेण्यासाठी तपासणी करण्यात आली, असे डॉ. राजुरकर यांनी सांगितले.

दरम्यान, या रुग्णालयावर कारवाईची मागणी करणारे निवेदन शिवसेनेचे (ठाकरे गट) उपजिल्हाप्रमुख गिरीश जाधव यांनी, मनपा आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांना दिले होते.

या निवेदनानंतर आयुक्त डांगे यांनी आरोग्य विभागाला तपासणीचे आदेश दिले.



लोकसत्ता
Classifieds
FROM ANYTHING TO EVERYTHING

व्यवसाय

रनिंग विविध लघुउद्योग सिकयुरिटी कपडे गारमेंट इलेक्ट्रिक ऑटोमेंटिव्ह मॅन्युफॅक्चरिंग गावरान पोल्ट्री डेअरी मत्स्यपालन डुक्कर फार्म लघुउद्योगांना प्रोजेक्ट फायनान्स उपलब्ध. संपर्क : 9326639729/ 9607602137.
0070997313-1

जागासंबंधी

आता आपल्या बजेटमध्ये मुंबई पुण्याजवळ तसेच कोकणात दर महिना उत्पन्न देणारीच जमीन खरेदी करा. सोबत चिरेबंदी बागायत घर मिळवा. संपर्क : 8591195551/ 9607602137.
0070996721-1

वृद्धाश्रम/सेवासंस्था

वृद्धाश्रमात रहात असताना आपल्या आयव्य कमी असलेल्या मुलां/ मुलीला सोबत राहण्याची विशेष व्यवस्था, घरच्याप्रमाणे प्रेमाने काळजी घेणाऱ्या व्यक्ती. केळकर काका ९४२१६३०८५८.
0090388345-1

मालमत्तासंबंधी

पावन गणपती शेजारी, नेवासा फाटा येथे ६ गुंठे बिगर शेती प्लॉटवर दोन मजली सुमारे ७ हजार चौ.फू बांधकाम असलेला दोन फ्लॅटचा कंपाऊंड सुरक्षित सर्व सोईयुक्त प्रशस्त बंगला त्वरित विकणे आहे.संपर्क: 9422235969, 8830351979
0130057646-2

जीवनसाथीच्या निवडीसाठी एकमेव मंगल मार्ग दर रविवारी लोकसत्ता तून जीवनसाथी

महत्त्वपूर्ण निवेदन

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींचा मजकूर (ॲडव्हर्टाइझिंग कॉपी) स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची (कन्टेन्ट) पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी, आपल्या वृत्तपत्रांमध्ये अथवा प्रकाशनांमध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तींबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान वा हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी द इंडियन एक्स्प्रेस (प्रा.) लिमिटेडला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे वाचकांना आम्ही असा सल्ला देतो की, जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्यांच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी त्यांनी आवश्यक ती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

**श्री गणेश स्टॅम्पिंग्ज प्रायव्हेट लिमिटेड**
सीआयएन: यू३१९०२पीएन२०१०पीटीसी१३५२९९
(मान. एनसीएलटी, मुंबई ह्यांचा आदेश दिनांकित ०६.१२.२०२२ अनुसार परीसमापन अंतर्गत कंपनी)
नोंदणीकृत कार्यालय: प्लॉट क्र. एल-१३५/५/२ एमआयडीसी इंडस्ट्रीयल क्षेत्र, अहमदनगर, महाराष्ट्र, भारत्त – ४१४१११.

**ई-लिलाव**

सूचना ह्याद्वारे देण्यात येत आहे की श्री. गणेश स्टॅम्पिंग्ज प्रायव्हेट लिमिटेड (परीसमापनामध्ये) (कॉर्पोरेट कर्जदार) ची विक्री इनसोलव्हन्सी अँड बँकरप्सी बोर्ड ऑफ इंडिया (परीसमापन प्रक्रिया) नियमावली, २०१६ च्या नियम ३२, ३२ (ए) मधील मुद्दा ई, नियम ३३ च्या उप नियम १ आणि परिशिष्ट १ च्या अनुषंगाने ई-ऑक्शन प्लॅटफॉर्म https://baanknet.com/ द्वारे करण्यात येणार आहे. **सर्व मत्तांसाठी पत्ता :** प्लॉट क्र. १३५/५/२, एमआयडीसी औद्योगिक क्षेत्र, अहमदनगर ४१४१११ येथे वसलेले.

| तपशिल | लिलावाचा दिनांक आणि वेळ | राखीव मूल्य | इसारा रक्कम ठेव | बोली वाढ मूल्य |
| --- | --- | --- | --- | --- |
| **ऑप्शन ए:** श्री गणेश स्टॅम्पिंग्ज प्रायव्हेट लिमिटेड, कॉर्पोरेट कर्जदार संदर्भात नियमावली ३२ (बी) अंतर्गत पूर्ण विक्री करण्यात येईल. | २५.११.२०२५ रोजी दु. ३:०० वा. पासून ते सायं.४:०० वा. पर्यंत | २,७५,००,०००.०० | २७,५०,०००.०० | ५,००,०००.०० |
| **ऑप्शन बी:** पार्सलमध्ये कॉर्पोरेट कर्जदाराच्या मत्तांची विक्री | २५.११.२०२५ रोजी दु. ३:०० वा. पासून ते सायं.४:०० वा. पर्यंत | | | |
| **पार्सल-१ :** (प्लांट आणि मशिनरी) | | ९१,००,०००.०० | ९,१०,०००.०० | १,००,०००.०० |
| **पार्सल-२ :** (टूल्स आणि वापरयोग्य वस्तूंसह इनव्हेंटरी) | | ४५,००,०००.०० | ४,५०,०००.०० | १,००,०००.०० |

**महत्वाच्या टिपा :**
१. विक्री https:// https://baanknet.com// येथे उपलब्ध असलेल्या “EAuction Process Information Document” मध्ये नमूद केलेल्या अटी आणि शर्तींच्या अधीन असेल आणि खालील अटींचे पालन केले जाईल;
२. जर ऑप्शन-अथनसाठी कोणत्याही बोली प्राप्त झाल्या नाहीत तर फक्त ऑप्शन-ब साठीच्या बोलींचा विचार केला जाईल. ज्या बोलीदाराचा लिलाव रद्द झाला आहे अशा बोलीदाराला मिळालेली इरठे रक्कम ५ दिवसांच्या आत परत केली जाईल.
३. हे स्पष्ट केले आहे की, हे आमंत्रण संभाव्य बोलीदारांना आमंत्रित करण्याचा हेतू आहे आणि विक्री प्रभावी करण्यासाठी लिक्विडेटर किंवा कंपनीवर कोणत्याही प्रकारचे बंधनकारक बंधन निर्माण करत नाही. श्री गणेश स्टॅम्पिंग प्रायव्हेट लिमिटेडच्या लिक्विडेटरला ई-लिलाव प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर कोणतेही कारण न देता आणि कोणतेही दायित्व न देता कोणत्याही संभाव्य बोलीदार/बोली/ऑफरला निलंबित करण्याचा/त्यागण्याचा/रद्द करण्याचा/वाढवण्याचा किंवा सुधारित करण्याचा आणि/ किंवा नाकारण्याचा किंवा अपात्र ठरवण्याचा अधिकार आहे.
४. ई-लिलाव “जसे आहे तिथे आहे”, “जसे आहे जे आहे”, “जेथे आहे ते”, “कोणतेही उत्पन्न नाही” आणि ‘एमआयडीसीने रद्द केलेल्या जमिनीचे वाटप’ या आधारावर मान्यताप्राप्त सेवा प्रदात्या, मेसर्स पीएसबीएलीअन्स प्रायव्हेट लिमिटेड (https://baanknet.com/) द्वारे केले जाईल.
५. बोलीदार राखीव किंमतीपेक्षा कमी किमतीवर बोली लावू शकत नाहीत.
६. यशस्वी बोलीदाराने देयक भरण्याचा कालावधी आयबीबीआय (लिक्विडेशन प्रक्रिया) नियमावली, २०१६ च्या अनुसूची १ च्या कलम १२ मध्ये प्रदान केल्याप्रमाणे असेल. पुढे, लिक्विडेशन नियमावलीच्या नियमावली ३१अ(१)(ह) नुसार, लिक्विडेशनने यशस्वी बोलीदाराने शिल्लक विक्री मोबदल्याच्या देयकासाठी वेळेत वाढ करण्याची तरतूद ठेवली आहे, जी तथापि, एससीसीच्या सदस्यांच्या मान्यतेच्या काटेकोरपणे अधीन आहे.
७. पात्रता कागदपत्रे आणि बोली सादर करण्याची अंतिम तारीख प्रक्रिया कागदपत्रांमध्ये नमूद केल्याप्रमाणे कागदपत्रे २३.११.२०२५ आहेत. तपासणी तारीख १०.११.२०२५ ते २३.११.२०२५ आणि बॅंकनेट लिलाव प्लॅटफॉर्मद्वारे अर्नेस्ट मनी डिपॉझिट (EMD) सादर करणे.
८. संभाव्य बोलीदारांनी एक हमीपत्र सादर करावे की त्यांना आयबीसी, २०१६ च्या कलम २९अ अंतर्गत लागू असलेल्या मर्यादेपर्यंत कोणत्याही अपात्रतेचा सामना करावा लागत नाही आणि कोणत्याही टप्प्यावर अपात्र आढळल्यास, अर्नेस्ट मनी डिपॉझिट जप्त केली जाईल.
९. वेळेत आणि/किंवा “ई-लिलाव प्रक्रिया माहिती दस्तऐवजात” अटी आणि शर्तींसह कोणतेही बदल मेसर्स पीएसबी अलायन्स प्रायव्हेट लिमिटेडच्या वेबसाइटवर सूचित केले जातील (https://baanknet.com/)
१०. इरठे (इसारा रक्कम ठेव) चा भरणा २३.११.२०२५ पर्यंत फक्त मे. पीएसबी अलायन्स प्रायव्हेट लिमिटेडच्या ई-वॉलेटद्वारे पेमेंटद्वारे करता येईल. (https://baanknet.com)
११. सर्व पात्रता कागदपत्रे २३.११.२०२५ पर्यंत फक्त baanknet पोर्टलवर अपलोड करणे आवश्यक आहे.
पुढील स्पष्टीकरण आवश्यक असल्यास कृपया मनोज कुमार मिश्रा यांच्याशी liquidation.ganesh@gmail.com द्वारे संपर्क साधा.

दिनांक: २५/१०/२०२५
ठिकाण: मुंबई

**मनोज कुमार मिश्रा**
परीसमापक म्हणून कार्यरत
**मे. श्री** गणेश स्टॅम्पिंग्ज प्रायव्हेट लिमिटेड
**आयपी नोंदणी क्रमांक:** आयबीबीआय/आयपी ए-००१/आयपी-पी/०११५२/२०१९/११९०२
**एएफए** ३१.१२.२०२५ पर्यंत वैध.
**नोंदणीकृत पत्ता:** ऑफिस क्रमांक १३/१४, दुसरा मजला, ८४/ ढोलकवाला इमारत, जन्मभूमी मार्ग, फोर्ट, मुंबई, एमएच - ४०० ००१
**नोंदणीकृत ईमेल आयडी:** ipmanojkumarmishra@gmail.com
**पत्रव्यवहार ईमेल आयडी:** liquidation.ganesh@gmail.com

# राष्ट्रवादी किसान सभेची प्रदेश कार्यकारिणी जाहीर

लोकसत्ता वार्ताहर

**अकोले :** राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार गट) किसान सभेचे प्रांताध्यक्ष ॲड. वसंत मनकर यांनी किसान सभेची प्रदेश कार्यकारिणी जाहीर केली आहे. या जंबो कार्यकारिणीमध्ये १० उपाध्यक्ष, ५ सरचिटणीस व ८ चिटणीस अशा एकूण २३ जणांचा समावेश आहे. त्याचप्रमाणे जिल्हाध्यक्षांची नावेही जाहीर करण्यात आली आहेत. अलीकडेच काही दिवसांपूर्वी राष्ट्रवादीच्या किसान सभेचे प्रांताध्यक्ष म्हणून मनकर यांची नियुक्ती करण्यात आली.

कार्यकारिणी पुढीलप्रमाणे : प्रदेश उपाध्यक्ष -डॉ. गणेश खारकर (अमरावती), जगदीश जुनगरी (चंद्रपूर), रामभाऊ हाडोळे (लातूर), बाळासाहेब देसाई (सांगली), सुनीता एरने (नागपूर), अनिल ठेंडे (अहिल्यानगर), वासुदेव बोळे (अमरावती), ज्ञान तहसीलदार (सांगली), राजेंद्र घोंगडे (यवतमाळ), राजीव करंजखेडकर (यवतमाळ). प्रदेश सरचिटणीस- डॉ. मंगेश देशमुख (अमरावती), डॉ. गणेश डोंगरे (ठाणे), दत्तात्रय तळोले (अहिल्यानगर), शशिकांत बापू कांबळे (सोलापूर), रामदास शंकरराव बारोटे (बुलडाणा). चिटणीस- अरुण भटकर (बुलडाणा), संपत नेमाणे (अहिल्यानगर), प्रभाकर गावंडे (अकोला), संपत पाटील (नांदेड), अविनाश गमे (वर्धा), सुरेश नेहतराव, (सोलापूर), पंकज काळवांडे (नागपूर), मंगेश जाधव (लातूर).

याशिवाय ३६ जिल्हाध्यक्षांची नावे जाहीर करण्यात आली आहेत. शेतकऱ्यांच्या बाजूने एकनिष्ठ राहून केंद्र व राज्य सरकारच्या योजना शेतकऱ्यांपर्यंत पोहचवणे व शेतकऱ्यांचा आवाज, त्यांचे दुःख शासनापर्यंत पोहचवणे हे काम किसान सभेचे असल्याचे मनकर यांनी सांगितले. लवकरच नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना नियुक्तिपत्र उपमुख्यमंत्री अजित पवार, प्रांताध्यक्ष सुनील तटकरे, कृषिमंत्री दत्ता भरणे, आमदार डॉ. शिवाजी गर्जे, आमदार डॉ. किरण लहामटे आदींच्या हस्ते मुंबईत देणार असल्याचे ते म्हणाले.

# राज्यातील कृषी सेवा केंद्रांचा मंगळवारी बंद

लोकसत्ता प्रतिनिधी

**अहिल्यानगर :** राज्य शासनाच्या कृषी विभागाच्या ऑनलाइन प्रणालीच्या (साथी पोर्टल फेज-२) विरोधात राज्यातील कृषी सेवा केंद्रधारक व्यापाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र फर्टिलायझर्स, पेस्टीसाईड्स, सीड्स डीलर्स असोसिएशनने (एमएएफडीए) मंगळवारी (दि. २८) राज्यातील सर्व कृषी सेवा केंद्र एकदिवसीय बंद पाळण्यात असल्याचे जाहीर केले आहे.

या आंदोलनाला अहिल्यानगर जिल्हा खते, बियाणे, कीटकनाशके डीलर्स असोसिएशनने पाठिंबा देत बंदमध्ये सहभागी होणार असल्याची माहिती संघटनेचे जिल्हा सचिव संग्राम पवार व अध्यक्ष छबूराव हराळ यांनी निवेदनाद्वारे दिली आहे.

जिल्हा संघटनेने या संदर्भात जिल्हा परिषदेचे कृषी विकास अधिकारी यांनी निवेदन देऊन ही माहिती दिली आहे. संघटनेच्या निवेदनात म्हटले, की साथी पोर्टल फेज-२ प्रणालीमुळे कृषी सेवा केंद्र चालविणाऱ्या विक्रेत्यांना अत्यंत क्लिष्ट प्रक्रिया, तांत्रिक अडचणी, तसेच व्यवहारात अनावश्यक विलंबाचा सामना करावा लागत आहे. परिणामी शेतकऱ्यांना शेतीसाठी खते, बियाणे, कीटकनाशके आदी वेळेवर मिळण्यात मोठे अडथळे निर्माण होत आहेत.

शेतकऱ्यांच्या शेती नियोजनावर त्याचा थेट परिणाम होत आहे. कृषी उत्पादनावरही त्याचे परिणाम दिसू लागले आहेत. प्रणालीतील विलंबामुळे खते-बियाण्यांचा पुरवठा उशिरा होत आहे, हे अन्यायकारक आहे, अशी भूमिका वितरकांच्या संघटनेने घेतली आहे. शासनाने प्रणालीतील त्रुटी दुरुस्त कराव्यात, अशी मागणी केली आहे.

आमचा बंद हा शेतकऱ्यांच्या हितासाठी आणि प्रणालीतील कार्यक्षमतेसाठी प्रतीकात्मक आंदोलन आहे. शासनाने त्वरित उपाययोजना करावी अन्यथा तीव्र आंदोलन करू, असा इशारा संग्राम पवार व छबूराव हराळ यांनी दिला आहे.